# प्रेसनोट

जा.क्र.पोउआ/वाहतूक/मा.सं.म.मोर्चा/पुणे शहर/६४८९/२०१८ पुणे, दिनांक – १९/०७/२०१८

**विषय** :- **दिनांक- २१/०७/२०१८ रोजी मातंग संघर्ष महामोर्चाचे अनुषंगाने करण्यात येणा-या वाहतूकीचे बदला बाबत.**

---

दिनांक २१/०७/२०१८ रोजी, सकाळी १०.०० वा. ते दुपारी १३.०० वा. चे दरम्यान पुणे शहर जिल्हा मातंग समाज आयोजीत **मातंग संघर्ष महामोर्चा, अण्णा भाऊ साठे यांचा पुतळा(सारसबाग) पुणे पासून ते जिल्हाधिकारी कार्यालय पुणे** पर्यंत काढणार आहेत. सदर मोर्चाचे दरम्यान वाहतुकीची कोंडी होऊ नये, वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, शेषराव सुर्यवंशी, पोलीस उप आयुक्त,मुख्यालय-२ व अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.)खेरीज करुन,**आवश्यकतेनुसार** मार्चाचे मार्गावरील वाहतूक वळविण्यात/बंद येणार आहे.

## वाहतूकीस बंद रस्ते व पर्यायी मार्ग –

| अ.क्र. | वाहतुकीस बंद रस्ता | पर्यायी मार्ग |
|---|---|---|
| १ | सारसबाग समोरील रस्ता- सावरकर चौक ते पुरम चौक ( जेधे चौकाकडून जमनालाल बजाज पुतळा मार्गे सावरकर चौकाकडे जाणेसाठी रस्ता बंद राहील.) | जेधे चौक- लक्ष्मीनारायण थिएटर- उजवीकडे वळुन मित्रमंडळ चौक -सावरकर चौक- डावीकडुन सिंहगड रोडने दांडेकर पुल उजवीकडे वळून शास्त्रीरोडने इच्छितस्थळी जाणे. |
| २ | पुरम चौक ते सेवासदन चौक ( बाजीराव रोड) | पुरम चौक टिळक रोडने एस.पी. कॉलेज न्यु इंग्लिश स्कुल मार्गे अलका टॉकीज चौक- टिळक चौक तेथून इच्छितस्थळी |
| ३ | सेवासदन चौक ते संतकबीर चौक ( लक्ष्मीरोड) | १. पॉवर हाऊस चौक-अपोलो टॉकीज-दारुवाला पुल-फ़डके हौद चौक- जिजामाता चौक-सकाळ प्रेस तेथून इच्छित स्थळी.<br>२.सेव्हन लव्ह चौक- स्वारगेट- पुरम चौक- टिळक रोड |
| ४ | संतकबीर चौक ते नरपतगीरी चौक(नेहरु रोड) | सेव्हन लव्ह चौक- गोळीबार मैदाण- खान्यामारुती चौक तेथून इच्छित स्थळी |
| ५ | नरपतगीरी चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय | साधू वासवानी चौक-किराड चौक- नेहरु मेमोरीयल हॉल उजवीकडे वळून बॅनर्जी चौक-डावीकडे वळून इच्छितस्थळी. |

| | | |
|---|---|---|
| ६ | बोल्हाई चौक येथे मोर्चा थांबल्यानंतर | कॅम्पमध्ये जाणा-या वाहनचालकांना आरटीओ-जहाँगीर - मंगलदास चौक तेथे उजवीकडे वळून कॅम्पमध्ये इच्छितस्थळी व पुणे स्टेशनकडे जाणा-या वाहनचालकांनी शाहीर अमरशेख चौक- मालधक्का चौक डावीकडे वळून पुणे स्टेशनकडे |

**मोर्चा जाण्याच्या वरील मार्गावर मोर्चा वेळे पुरते सर्व प्रकारच्या वाहनांना पार्कींगसाठी मनाई राहील.** तसेच नमुद रस्ते व त्यांना जोडणारे इतर लहान रस्ते वाहतुकीकरिता बंद राहतील. तरी मोर्चा जाणा-या मार्गाचा वापर करणा-या सर्व वाहनचालकांनी / नागरीकांनी आपली गैरसोय टाळण्याकरीता वरील नमुद वेळे पुरता सदर भागातील रस्त्याचा वापर टाळून इच्छितस्थळी जाण्याकरीता इतर पर्यायी मार्गाचा वापर करावा.